पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

# पुणे महानगरपालिका

## ✷ सूचना ✷

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका (मा.महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे) नियम २००५ व सुधारीत नियम २००६ मधील नियम क्रं.३ (२) अन्वये)

कार्यपत्रिका क्रमांक – ११
डिसेंबर २००९

मुंबई प्रांतिक महानगरपालिका **(मा.महापौर आणि मा.उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे)** नियम २००५ व सुधारीत नियम २००६ मधील नियम क्रं.३(२) अन्वये पुणे महानगरपालिकेची खास सभा **(विशेष बैठक) मंगळवार दिनांक १ डिसेंबर २००९** या दिवशी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात)भरेल.**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

:–निवडणूका –:

**विषय क्रं. ३१४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड मुंबई प्रांतिक महानगरपालिका **(मा.महापौर व मा.उपमहापौर या पदासाठी निवडणूका)** नियम २००५ व सुधारीत नियम २००६ मधील नियम क्र. ७(३) प्रमाणे हात वर करुन करणे.

(टीप :– १) महाराष्ट्र महानगरपालिका **(मा.महापौर पदाचे आरक्षण)** नियम २००६ अन्वये पुणे महानगरपालिकेचे महापौर पद **अनारक्षित (खुला प्रवर्ग)** आहे.)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका(मा.महापौर आणि मा.उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे) नियम २००५ व सुधारीत नियम २००६ मधील नियम क्रं. ५ अन्वये **मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त यांचे आदेशानुसार मा.चंद्रकांत दळवी,जिल्हाधिकारी,पुणे हे असतील.**

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे ५
दि.२३ नोव्हेंबर २००९

**सुनिल पारखी**
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

---

**टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.**

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक : २७/११/२००९

पुणे महानगरपालिका

✷ सूचना ✷

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील

नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – १२**

**(खास सभा)**

मा. आबा बागुल, विरोधी पक्षनेते, मा. विरेंद्र किराड, मा. ॲड. अविनाश साळवे, मा. विजय देशमुख, मा. राजेंद्र वागसकर, मा. ॲड. निलेश निकम, अध्यक्ष, स्थायी समिती या स्थायी समितीच्या ६ (सहा) मा.सभासदांकडून दिनांक २५/११/२००९ रोजी लेखी मागणी (रिक्वीझिशन) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची **विशेष (खास ) सभा गुरुवार,दिनांक ३/१२/२००९ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात)भरेल.**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**विषय क्र. ३१५**

संदर्भ :–
१) विषयपत्र जा.क्र. मआ/उआ(जिंघ)/से/७७१ दि. ६/११/२००८.
२) विषयपत्र जा.क्र. मआ/उद्यान/से/१३३४ दि. ४/२/२००९.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. २३२७ दि. १७/३/२००९.
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उ.आ/से/१७४, दि.३०.६.२००९ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३९० दि. २४/७/२००९.
६) मे.उच्च न्यायालयाचे दि. २३/९/२००९ चे आदेश.
७) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/५०० दि. २९/९/२००९ चे पत्र.
८) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८४९ दि. ६/१०/२००९
९) मा.विरेंद्र किराड, मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.ॲड्.अविनाश साळवे व मा.हनिफ शेख यांची दि. २१/१०/२००९ ची उपसूचना
१०) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८६६, दि. २१/१०/२००९

---

मा.महा.आयुक्त यांचे संदर्भ क्र. १, २, ४ व ७ चे पत्र अवलोकन केले.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

कोथरुड स.नं. १४३/१/२,१४३/३, १४४/१+२ या जमिनीवरील टीडीआर संबंधी मे.उच्च न्यायालयाने श्री. दिपक भालचंद्र कुलकर्णी, सहा.अभियंता, श्री. दत्तात्रय तांबारे, कनिष्ठ अभियंता, श्री. मधुसूदन येनकर, कनिष्ठ अभियंता, श्री. रविंद्र थोरात, विधी सल्लागार, श्री. सिताराम कडू, मेंटेनन्स सर्व्हेअर व श्री. चंद्रसेन नागटिळक, कनिष्ठ अभियंता यांचेविरुध्द अभियोग दाखल करण्याबाबत मे.स्थायी समितीने परवानगी देण्याचे निर्देश आहे. त्यानुसार मा.स्थायी समितीस श्री.दत्तात्रय तांबारे,कनिष्ठ अभियंता हे सकृत दर्शनी जबाबदार आढळतात. त्यामुळे त्यांच्या विरुध्द अभियोग दाखल करण्यास परवानगी देत आहे. उर्वरीत

श्री.दिपक कुलकर्णी, श्री.मधुसूदन येनकर, श्री.रविंद्र थोरात, श्री.सिताराम कडू व श्री.चंद्रसेन नागटिळक यांचेविरुध्द क्रिमिनल इंटेशन व मालाफाईड इंटेशन आढळून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासनाने खातेनिहाय चौकशी करुन योग्य ती कारवाई व्हावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप :– सदर विषयामधील सेवकांवर अभियोग दाखल करण्यास परवानगी देण्यापूर्वी त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी असे म. न. पा. ठराव क्रमांक ३११, दिनांक २५/११/२००९ अन्वये ठरविण्यात आले आहे.)**

नगरसचिव कार्यालय, **मा.महापौर यांचे आज्ञेवरुन**
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५ **नगरसचिव,**
दिनांक :– २७/११/२००९ **पुणे महानगरपालिका**

**(टिप :–प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १३**
**डिसेंबर २००९**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. १८ डिसेंबर २००९ रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

**<u>विषय क्र. ३१६</u>**

संदर्भ :– १) मा. आबा बागुल, मा. सुनिल कांबळे, मा. वसंत मोरे, मा. विजय मारटकर, मा. राजेंद्र काची, मा. महादेव बाबर, मा. दिलिप उंबरकर, मा. संदिप लडकत, मा. अरुण धिमधिमे, मा. सौ.अलका खाडे, मा. बापूसाहेब पठारे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. दिपक मानकर, मा. सौ. कमल व्यवहारे, मा. सुनिल बनकर व मा. शंकर बेलदरेपाटील यांचे दि. २८/२/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १९४२, दि. २८/२/२००८.

३) मनपा ठराव क्रं. ५७,दि.२१/५/२००८.

४) मनपा ठराव क्रं. ३०८, दि.२१/११/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

नव्याने होणाऱ्या एस.आर.अे. योजनेमध्ये पुणे मनपाचे नगरसेवकांचा त्या भागामध्ये होणाऱ्या पुर्नवसनामध्ये समावेश असावा, कारण योजना होत असताना झोपडपट्टी धारकांना दमदाटी केली जाते. त्यामुळे त्या– त्या भागातील नगरसेवकांचा समावेश असण्यास व एस.आर.अे. चा नकाशा मान्य करण्याचे अधिकार १९४९ च्या नियमानुसार महापालिकेला देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदर ठरावास मा.महा.आयुक्त यांनी महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २६४, दि. २४/११/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. ३१७</u>**

संदर्भ :– १) मा.चौकशी अधिकारी यांचा खाचौ/एसआर/२६/०७,दि.१/११/२००७चा निष्कर्ष अहवाल.

२) कारणे दाखवा नोटीस जा. क्र. सहमआ/खाचौवि/१०१७, दि. १६/११/२००७.

३) कारणे दाखवा नोटीस जा. क्र. सहमआ/खाचौवि/७, दि. ३/४/२००८.

४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उका/खाचौवि/१२५,दि.२९/४/२००८ चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्रं. २४८,दि.२७/५/२००८.

६) मनपा ठराव क्र. २६१, दि. २०/१०/२००८.

७) मनपा ठराव क्र. ३०, दि. २३/६/२००९.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

श्री. भारत सदाशिव मोरे, नर्सिंग ऑर्डली, आरोग्य विभाग यांचे विरुध्दचे खातेनिहाय चौकशीप्रकरणी त्यांचे विरुध्द सिध्द होत असलेल्या आरोपाचे परिणामी कारणे दाखवा नोटीशीमध्ये प्रस्तावित केलेली शिक्षा कायम करुन त्यांना मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार मनपा सेवेतून काढून टाकण्यास (Removal from Municipal Service) व तशा आशयाचे आज्ञापत्र मा.अति.महा.आयुक्त(ज) यांच्या स्वाक्षरीने प्रसुत करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २७५, दि. २४/११/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ३१८</u>**

संदर्भ :–
१) शासन निर्णय क्र. सीडीआर–१३०७/प्र.क्र.३/०७/११/–अ दि. १८/१०/२००७.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७.
३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/७९ दि. १७/४/२००८ चे पत्र.
४) विधी समिती ठराव क्र. ९ दि. ७/५/२००८.
५) स्थायी समिती ठराव क्र. ५७२, दि. २२/७/२००८.
६) मनपा ठराव क्र.३८२, दि. १८/१२/२००८.
७) मनपा ठराव क्र. ३१, दि. २३/६/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन व स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्याकडील सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ निलंबित असलेल्या सेवक/अधिकारी यांना कामावर रुजू करुन घेणेस व सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी ७५% निर्वाह भत्ता देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७ मधील शासनाच्या नियमाप्रमाणे सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी ७५% निर्वाह भत्ता देणे यासाठी याबाबत प्रचलित मनपा सेवाविनियम क्र. ५८ मध्ये दुरुस्ती करुन मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्टाप्रमाणे येथून पुढे कार्यवाही करणेस

२) मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७ मधील या प्रकरणी निलंबित झालेल्यांसाठी जर सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ निलंबित असेल व दोषारोप सादर केले नसेल आणि पद रिक्त राहत असेल तर दोषारोप सादर होईपर्यंतच्या काळात रुजु करुन घ्यावे याबाबत मे.राज्य शासनाकडून प्रसृत करण्यात आलेल्या अथवा याबाबत मे.राज्य शासनाकडून वेळोवेळी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या शासन आदेशामधील मार्गदर्शक तत्वांनुसार पुणे महानगरपालिकेमधून निलंबित झालेल्या सेवक/अधिकारी यांचे निलंबन मागे घेणेबाबतची कार्यवाही करणेस

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ७१, दि. २४/११/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ३१९</u>**

संदर्भ :–
१) स्थायी समिती ठराव क्र. ६२५ दि. १६/८/१९६९.
२) स्थायी समिती ठराव क्र. १३७७ दि. १६/१२/१९९७.
३) जागा मालकांतर्फे ॲड्.चौधरी यांनी पुणे महानगरपालिकेस बजावलेली खरेदी सूचना दि.१७/१०/२००८.

४) विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६ यांचे पत्र जा.क्र. एलए/२१६/९०५३, दि.२४/११/२००८.

५) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूप्रा/१०१७ दि. १२/१२/२००८ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७३१, दि. ६/१/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे, पेठ बुधवार सि.स.नं. ७६७ येथील रस्तारुंदीतील बाधित मिळकतीचे भूसंपादन करण्यासाठी जागा मालकांतर्फे ॲड्.चौधरी यांनी बजावलेल्या खरेदी सूचनेनुसार सहा महिन्यांचे दरम्यान भूसंपादनाची कार्यवाही सुरु होणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षण रद्द होऊ शकते. सबब ॲड्.पी.जी.चौधरी यांनी दिलेल्या खरेदी सुचनेनुसार सि.स.नं. ७६७, ७६६, ७५२, ५२५ ते ५३५, ५६५ ते ५७५ इ. बुधवार पेठ या मिळकतींवर कलम २१०(१)(ब) अन्वये आखण्यात आलेल्या रस्तारुंदी क्षेत्राचे भूसंपादन करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २६६, दि. २४/११/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. ३२०**

संदर्भ :– १) मा.संजय नांदे व मा. विरेंद्र किराड यांचे दि. २४/८/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६६७, दि. ३१/८/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

धनकवडी स. नं. ४, ५, ६, ९, १०, ११ दक्षिण उत्तर (स्मशान भूमीपासून) वनशिवपर्यंत डी. पी. रस्ता करणेसाठी र. रुपये १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १०. पथ, १०.क. पथ सुधारणा पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी एस–२), पान क्र. २३४, अ.क्र. ३६७, स. नं. ९ धनकवडी डी. पी. रोड तयार करणे. | १ कोटी | --- |
| नविन सुचविलेले काम धनकवडी स. नं. ४, ५, ६, ९, १०, ११ दक्षिण उत्तर (स्मशान भूमीपासून) वनशिवपर्यंत डी. पी. रस्ता करणे. | --- | १ कोटी |

मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महा. आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं.२८७, दि. २५/११/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. ३२१**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/३८१ दि. २७/८/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६९७, दि. ३१/८/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे बुधवार पेठ सि.स.नं. ७१६ संपदा बँकेजवळ गाळा पुणे महानगरपालिकेमार्फत बांधिव इमारतीमध्ये व्यवसायिक गाळे बांधणेत आले आहेत. येथील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र. १ ते ८

भाडेतत्वार देणेसाठी निविदा मागविल्या असता प्रती गाळा ३ ते ४ ठेकेदारांनी निविदा दाखल केल्या आहेत. त्यानुसार जास्तीत जास्त वार्षिक भाडे देऊ शकणाऱ्या खालील निविदा धारकास

गाळा क्र.१ – करीता कुलकर्णी जयश्री सुधीर यांनी देऊ केलेली वार्षिक भाडे र.रुपये ४१,५००/– स्विकारुन

गाळा क्र. २ – करीता प्रेरणा महिला व बालविकास प्रतिष्ठान यांनी देऊ केलेली वार्षिक भाडे र.रुपये ५०,७५०/– स्विकारुन

गाळा क्र.३ – करीता श्री.रघुनाथ गजानन मुंढे यांनी देऊ केलेली वार्षिक भाडे र.रुपये १५,३५०/– स्विकारुन

गाळा क्र.४ – करीता अपर्णा संजय वाणगीकर यांनी देऊ केलेली वार्षिक भाडे र.रुपये १५,६५०/– स्विकारुन

गाळा क्र.५ – करीता उपेंद्र राजेंद्र सरदेशपांडे यांनी देऊ केलेली वार्षिक भाडे र.रुपये १४,५००/– स्विकारुन

गाळा क्र.६ – करीता किसन बाबुराव वाडेकर यांनी देऊ केलेली वार्षिक भाडे र.रुपये १५,७५०/– स्विकारुन

गाळा क्र. ७ – करीता कविता संजय देशमुख यांनी देऊ केलेली वार्षिक भाडे र.रुपये १५,०००/– स्विकारुन

गाळा क्र. ८ – करीता सिमा देविदास जांभुळकर यांनी देऊ केलेली वार्षिक भाडे र.रुपये १६,०००/– स्विकारुन

तसेच १) वार्षिक भाडे रकमेत प्रतिवर्षी १२% भाडेवाढ करणेस

२) त्याकरिता त्यांच्याशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच ताबा देणेपूर्वी ६ महिन्यांचे मासिक भाडे अनामत म्हणून व ३ महिन्यांचे आगाऊ मासिक भाडे स्विकारुन ५ वर्षे कालावधीसाठी चालविणेस देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ३२२</u>

संदर्भ :– १) मा. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील जावक क्रमांक पीएमसी–३००७/प्र.क्र./नवि–२२, दिनांक २४–८–२००९. चे पत्र.

२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/एचओ/४८६ दि. २७/१०/२००९ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८९९, दि. ३/११/२००९.

–––

पुणे शहरात ऑगस्ट २००९ मध्ये इन्फल्यूएंझा ए (एच१ एन१) या आजाराच्या साथीचा प्रादुर्भाव झाल्याने या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी विविध उपाय योजना करण्याचे अधिकार शासनाचे संदर्भांकित पत्रान्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ,१९४९ चे कलम ३१९ अन्वये आवश्यक त्या उपाय योजना करण्यासाठी अधिकार प्रत्यार्पित केले आहेत. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ,१९४९ चे कलम ३१९ कलमांतर्गत राज्य शासनाचे मंजूरीनंतर आवश्यक त्या तातडीच्या उपाय योजना करण्याकरीता विहित केलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने कलम ३१९ (२) अन्वये घेतलेल्या निर्णयाची माहिती मा.मुख्य सभेस खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) शहरातील सर्व वैद्यकीय व्यावसायिक आणि रुग्णालये यांना मा. महापालिका आयुक्त कार्यालय जा. क्र. मआ/एचओ/२८८५ दि. १८/९/२००९ अन्वये निर्देशित करण्यात आले की,

त्यांचेकडे येणाऱ्या रुग्णांस नॉव्हेल एन्फ्लूएंझा ए–एच–१ एन–१ ची बाधा झाली असल्याचे त्यांचे तपासणीमध्ये संशय आल्यास अशा रुग्णांना लिखित स्वरुपात चिठ्ठी देऊन पुणे महानगरपालिकेच्या तपासणी केंद्रावर पुढील तपासणीसाठी तत्क्षणी पाठवावे आणि सदर रुग्ण तपासणी केंद्रावर गेल्याची खात्री करावी.

तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये दाखल केलेल्या गंभीर स्थितीतील रुग्णांस एन्फ्लूएंझा ए–एच–१ एन–१ ची बाधा झाली असल्याचा संशय आल्यास तत्क्षणी ०२०– २६०५८२४३, २६०५८८४२ या दूरध्वनी क्रमांकावर महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांना टॅमि फ्ल्यू औषधाच्या उपचारासाठी कळवावे.

२) बी. पी. एम. सी. ॲक्टच्या तरतूदीनुसार सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास यापूर्वीच प्रतिबंध करण्यात आलेला आहे. त्यासाठी प्रशासकीय शुल्क रु. २५/– आकारण्यात येत होते. तथापि, एच१एन१

इन्फ्लूएंझाची लागण बाधित व्यक्तीच्या थुंकण्याच्या तुषांरामुळे आजार पसरण्याची शक्यता असल्याने प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा भाग म्हणून दंडात्मक कारवाईची शास्ती रुपये १०००/– (अक्षरी रुपये एक हजार) वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यास प्रसिध्दी देण्यात आली. सदरच्या दंडाची रक्कम वसूल करण्याचा अधिकार आरोग्य प्रमुख, उप आयुक्त (वि. का. क्र. १ ते ४), सर्व क्षेत्रीय अधिकारी, सर्व क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, विभागीय आरोग्य निरीक्षक, बहुउद्देशीय पथक, आरोग्य निरीक्षक, मोकादम, यांना प्रदान करण्यात आले.

३) महाराष्ट्र शासन अन्न औषध प्रशासनामार्फत खाजगी मेडिकल स्टोअर्स / हॉस्पिटल कडील औषध विक्रेत्यांना टॅमी फ्ल्यू औषध विक्रीस दि. २२ सप्टेंबर २००९ च्या सुमारास देण्यात आली त्यामुळे जे रुग्ण टॅमी फ्लू औषध घेत आहेत. त्याची माहिती आरोग्य खात्याला होण्याकरीता शहरातील टॅमिफ्लू औषध विक्रीसाठी मान्यता प्राप्त दुकानदारांना रोज टॅमी फ्लू घेणाऱ्या रुग्णांचे नाव व पत्ता कळविणे बंधनकारक करण्यात आले. त्याच पार्श्वभूमीवर ज्या रुग्णांना आपण टॅमी फ्ल्यू (ओसेल्टॅमीर) या औषधाची विक्री केली आहे त्यांची माहिती निर्देशित केलेल्या तक्त्यानुरुप भरुन दररोज महापालिकेकडे दुरध्वनी क्र. २५५०११०५ / ९६८९९३१११०/ ९६८९९३११०८ व फॅक्स क्र. २५५०११०४ कळविणे बंधनकारक करण्यात आले.

**<u>विषय क्र. ३२३</u>**

संदर्भ :– १) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र. कडोंमपा–२००६/प्रक्र.१९२/२००६, नवि–२८,दि. २ मार्च २००९.
२) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र. कडोंमपा–२००६/प्रक्र.१९२/२००६, नवि–२८,दि. २ मार्च २००९.
३) शासन निर्णय क्र. रफेधो–०३०९/प्रक्र.२०/नवि–३४, दि. २ मार्च २००९.
४) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/से/४८७ दि. २७/१०/२००९ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र. ९०१, दि. ३/११/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे व नियंत्रण व निर्मुलनासाठी नागरी पोलिस यंत्रणा व विशेष न्यायालय स्थापन करणे तसेच राष्ट्रीय फेरीवाला व्यवसायाचे विनियमासाठी पुणे मनपा आस्थापनेवर विविध पदे नव्याने निर्माण करण्यास खालील अ.क्र. १ ते ५ बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) शासन निर्णयाप्रमाणे पुणे मनपा हद्दीतील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे व नागरी गुन्हे यांचेविरुध्द परिणामकारक कारवाई करणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या तक्ता अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मनपा आस्थापनेवर विविध हुद्याची ५०० पदे निर्माण करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चाची जबाबदारी मनपाने स्विकारणेस

२) नागरी पोलिस व विशेष पोलिस ठाणे करिता पोलिस आयुक्त कार्यालयाकडे १६० नविन पदे निर्माण करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चाची जबाबदारी मनपाने स्विकारणेस

३) न्याय विभागाकडे न्यायालयासाठी १७ नव्याने निर्माण करावयाची पदे निर्माण करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या खर्चाची जबाबदारी मनपाने स्विकारणेस

४) बिट निरिक्षक या एका हुद्याची नविन पदे निर्माण करावी लागणार असल्याने यांची शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी खालीलप्रमाणे निश्चित करण्यास

बिट निरिक्षक : वेतनश्रेणी रुपये ४५०० ते १००४५

अ) एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण

ब) शासनाकडील आयटीआय संस्थेतील सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण

५) सदर धोरणाची अंमलबजावणी राज्य शासनाच्या अंतिम मान्यतेनंतर करण्यास

**विषय क्र. ३२४**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्रं.मआ/उपआ(ज)/२०१. दि.१५/७/०९ चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. १२ दि. १३/८/२००९.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. ९०९, दि. ३/११/२००९.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नांवे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा त्यांना खालील अटीवर अदा करणेस मान्यता द्यावी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा. महा.आयुक्त यांचे या विषयपत्रालगतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या संस्थांनी जरुर तो करारनामा लिहून दिल्यानंतर संस्थांच्या नावे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा संबंधित संस्थांना अदा करणेस.

ब) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतचे परिशिष्टाध्ये नमूद केलेल्याप्रमाणे शासकीय अधिकारी यांची नेमणुक करणेस.

क) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर ती संस्था ज्या वॉर्डाध्ये येत असेल त्या वॉर्डाचे विद्यमान सभासद नेमणेस.

ड) मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्याप्रमाणे संबंधित संस्थांची नांवे व पत्ते दुरुस्ती व बदल करणेस.

**विषय क्र. ३२५**

संदर्भ :– १) शिक्षण मंडळ ठराव क्र. १६७ दि. २०/८/२००९.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ९१२, दि. ३/११/२००९.

–––

मा.शिक्षण मंडळाने दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे मनपा शिक्षण मंडळाचे सन २००९–१० या वर्षात मतिमंद शाळेच्या अर्थशिर्षामधून भारतातील पहिली महापालिका संचालित पुणे मनपा शिक्षण मंडळाचे वतीने मतिमंद मुलांसाठी प्राथमिक शाळा सुरु करण्यात आलेली आहे.

सदरहू शाळेत चालू शैक्षणिक वर्षात ६० विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित केलेला असून सदरहू शाळेसाठी शासन नियमानुसार निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार (दि. १८ ऑगस्ट २००४ इडीडी २००३/प्रक्र ३४०/भाग–३/सुधार–२) एक मुख्याध्यापक, अपंग मतिमंद विद्यार्थ्यांसाठी ६ विशेष शिक्षक, त्याचबरोबर २० विद्यार्थ्यांमागे दोन याप्रमाणे सहा सेविका तसेच शाळेसाठी दोन शिपाई इ.पदांना कायम वेतनावर शासनाने निश्चित केलेल्या स्केलवर नेमणूक करणेसाठी, तसेच सदरहू पदांसाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद शिक्षण मंडळाचे सन २००९–१० चे अंदाजपत्रकातील मतिमंद शाळा या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीतून करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ३२६**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भुजिं/५०२ दि. ५/११/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ९५६, दि. १७/११/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे पेठ नारायण ४३७/क/१ व ४३७/अ/२ (हमालवाडा) येथील बहुमजली वाहनतळ ५ वर्षे मुदतीकरिता ठेका पध्दतीने चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या ४ निविदांपैकी श्री.अरविंद जयसिंग कोकाटे यांची निविदा र.रुपये १,३५,७८६/– दरमहा या दराची असून ती मनपा अपेक्षित रकमेपेक्षा र.रुपये ३५,४११/– ने जास्त असल्याने त्यांनी देऊ केलेली सर्वात जास्त मासिक र.रुपये १,३५,७८६/–

(व प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ) स्विकारुन व ताबा दिनांकापासून ५ वर्षे निविदा शर्ती अटीप्रमाणे वाहनतळ चालविणेस देणेकरिता व त्याअनुषंगाने त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ३२७**

संदर्भ :– १) उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचे पत्र जा.क्र. १/३०९१८ दि. १९/११/२००७ चे पत्र.
२) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा मान्यता ठराव क्र. ६/१८६ दि. २८/१०/२००९.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/माध्य व तांत्रिक/४९९ दि.३/११/२००९ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६६, दि. १७/११/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेमार्फत ६२६ शुक्रवार पेठ, शिवाजी रोड, पुणे २ येथे केंद्रशासनाच्या मान्यतेने श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) १९६३ सालापासून सुरु असून येथे टर्नर, फिटर, मेकॅनिकल ड्राफ्टसमन व इलेक्ट्रिशियन हे चार मुलभूत कोर्सेस कायम विना अनुदानित तत्वावर सुरु असून येथे सुमारे २३० विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या तंत्र शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. तथापि वाढत्या औद्योगिककरणास लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करणे व पुणे शहराची व परिसराची औद्योगिक भरभराट होणे व पर्यायाने रोजगार निर्मिती होवून बेरोजगाराची समस्या कमी करणे याकरिता बऱ्याच कालावधीपासून फक्त ४ च व्यवसाय चालू असणाऱ्या आपल्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये नविन व्यवसाय व व्यवसायात वाढ, विस्तारीकरण व क्षमता वाढ करणे आवश्यक आहे, असे संदर्भ क्र. १ अन्वये मा.उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र शासन यांनी सुचविल्याप्रमाणे या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात १ वर्ष मुदतीत कायम विनाअनुदानित तत्वावर १) कॉम्प्युटर ऑपरेटर अ‍ॅण्ड प्रोग्रामिंग असि. (सी.ओ.पी.ए.) २) वेल्डर (गॅस व इलेक्ट्रिक वेल्डींग) हे कोर्सेस सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.
(टिप :– सदरचे कोर्सेस नव्याने सुरु करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व उपशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागणार आहे.)

**विषय क्र. ३२८**

संदर्भ :– १) मा.सौ.संगिता गायकवाड यांचे दि. १३/११/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०१२, दि. २४/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

औंध स.नं. १५४ गोळवलकर गुरुजी मनपा शाळा आवार पुणे महानगरपालिका आरोग्य कोठी इमारतीमधील विरंगुळा केंद्रातील हॉलवरील पहिला मजला आमदार निधीतून बांधण्यात आला असून सदर जागेचे क्षेत्रफळ १२४० फुट आहे. सदरची इमारत ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र म्हणूनच बांधलेली आहे.

औंध गाव ज्येष्ठ नागरिक संघ, औंध, पुणे ७ नोंदणी क्र. फेस्कॉन रजि.नं. पी.टी.ए.एफ.७५२८ मुंबई जा.क्र. ११५/२००२–२००३ ही संस्था स्थानिक ग्रामस्थ व नागरिकांनी स्थापन केलेली आहे. या संघाचे वतीने अनेक विविध उपक्रम औंध भागातील ज्येष्ठ नागरिकांकरिता राबवित असते. सदरचा हॉल औंध गाव ज्येष्ठ नागरिक संघ यांना भाड्याने दिल्यास त्यांचे कार्यास मदत होणार आहे.

तरी वरील पुणे महानगरपालिका आरोग्य कोठी इमारतीमधील विरंगुळा केंद्र हॉल जागा क्षेत्रफळ १२४० फुट औंध गाव ज्येष्ठ नागरिक संघ, औंध, पुणे ७ यांना दिर्घ मुदतीचे भाडे कराराने देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ३२९**

संदर्भ :– १) मा.दिपक मानकर यांचे दि. १८/११/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०१५, दि. २४/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ५७ शंकरराव मोरे विद्यालय येथे विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १५२, अ.क्र. २१, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे (यादी क्र.एस–११), पान क्र. २४१, अ.क्र. ९१, वॉर्ड क्र. ५७ मध्ये समप्रमाणात विद्युत लोड करण्यासाठी ट्रान्सफॉर्मर्सची क्षमता वाढविणे व तीन नविन मोठ्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर्स बसविणे | १० लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ५७ शंकरराव मोरे विद्यालय येथे विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे | ––– | १० लाख |

**विषय क्र. ३३०**

संदर्भ :– १) मा.सौ.मनिषा घाटे व मा.बंडु गायकवाड यांचे दि. १८/११/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०१९, दि. २४/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ८१ मध्ये अंबिल ओढा कॉलनी येथे अभ्यासिका करणे र. रु. १० लाख व वॉर्ड क्र. ८१ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे र. रु. १० लाख असे एकूण र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १७.खेळ व क्रिडांगणे, पान क्र. १८०, अ.क्र. ५१, शहरातील विविध क्रिडांगणांमध्ये विकास कामे करणे, (यादी एस–२८), पान क्र. २५६, अ.क्र. १०, वॉर्ड क्रं.८१ लोकमान्य नगर मधील जॉगींग पार्क मधील हॉलचा विस्तार करणे. | २० लाख | ––– |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉर्ड क्रं. ८१ मध्ये अंबिल ओढा कॉलनी येथे अभ्यासिका करणे. | ––– | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. ८१ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. | ––– | १० लाख |

**विषय क्र. ३३१**

संदर्भ :– १) मा.सौ.मनिषा घाटे व मा.बंडु गायकवाड यांचे दि. १८/११/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०२०, दि. २४/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ८१ दांडेकर पूल स. नं. २१४ येथे पाणीपुरवठ्याची कामे करणे र. रु. १० लाख व वॉर्ड क्र. ८१ येथे विविध ठिकाणी ड्रेनेजची कामे करणे र. रु. ५ लाख असे एकूण र.रु. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. २८, अ.क्र. २, मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल्स), उपमुख्य मलनि:सारण नलिका, मलनि:सारणासंबंधी इतर कामे, स्थापत्य कामे, साधनसामुग्री, (अ) शहराच्या मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी ड्रेनेज लाईन टाकणे, (यादी क्र.एस–६), पान क्र. ५०, अ.क्र. ९७, वॉर्ड क्रं. ८१ लोकमान्य नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्रं.८१ दांडेकर पूल स. नं. २१४ येथे पाणीपुरवठ्याची कामे करणे. | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. ८१ येथे विविध ठिकाणी ड्रेनेजची कामे करणे. | --- | ५ लाख |

**विषय क्र. ३३२**

संदर्भ :– १) मा.ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. १८/११/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०२१, दि. २४/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

संत गाडगेबाबा महाराज जयंतीनिमित्त गाडगे महाराज सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यासाठी र.रु. ५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी एस–२), पान क्र. २२७, अ.क्र. ३३, वॉर्ड क्र. १२ सेंट जोसेफ कॉलनी रस्ता पेव्हरने डांबरीकरण करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| संत गाडगेबाबा महाराज जयंतीनिमित्त गाडगे महाराज सांस्कृतिक महोत्सव साजरा करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ३३३**

संदर्भ :– १) मा.सौ.सुनिता चिंतल व मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि. १८/११/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०२२, दि. २४/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १३८ सुपर इंदिरानगर व अप्पर इंदिरानगर येथील गल्लीबोळ कॉंक्रीट करणे व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेसाठी र.रुपये १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाज मंदिर ग्रंथालय,वाचनालय अभ्यासिका बांधणे, (यादी क्र.एस १६), पान क्र. २५४, अ.क्र. १२१ वॉर्ड क्र. १३८ अप्पर इंदिरानगर विठ्ठल मंदिराशेजारील समाजमंदिरावर पहिला मजला बांधणे | १० लाख | --- |
| पान क्र. २५४, अ.क्र. १२२, वॉर्ड क्र. १३८ सुपर इंदिरानगर शंकर | | |

| | | |
|---|---|---|
| मंदिराशेजारील उद्यानात अभ्यासिका बांधणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. १३८ अप्पर इंदिरानगर येथील गल्लीबोळ कॉंक्रीट करणे व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. १३८ सुपर इंदिरानगर येथील गल्लीबोळ कॉंक्रीट करणे व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ३३४**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ/से/५५३ दि. १८/११/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३१, दि. २४/११/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे शहरामध्ये दररोज सर्वसाधारणपणे १५०० मेट्रीक टन कचरा निर्माण होतो. मा.महा.आयुक्त यांचे पत्रात नमूद केलेली वस्तुस्थिती, घनकचरा व्यवस्थापन कामाची व्याप्ती, स्वरुप व गांभीर्य लक्षात घेऊन या कामासाठी पुणे महानगरपालिकेकडे विशेष कार्याधिकारी (घनकचरा व्यवस्थापन) या हुद्याची एक जागा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) नुसार कायम स्वरुपी निर्माण करुन त्या पदावर अतिरिक्त जिल्हाधिकारी/अधिक्षक अभियंता/उप मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा तत्सम दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून शासनाच्या प्रतिनियुक्तीवर नेमणूक करणेस तसेच याची अंमलबजावणी शासनाची मान्यता मिळाल्यानंतर करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ३३५**

संदर्भ :- १) मा.सुनिल गोगले यांचे दि. २८/५/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. २१८ दि. २/६/२००९

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विका क्र.२/५३३ दि. १३/११/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३३, दि. २४/११/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

वॉर्ड क्र. १६ मध्ये पोलिस वसाहत येथे पाण्याची संपवेल बांधून कार्यान्वित करणे या कामासाठी र.रुपये १५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. २८, अ.क्र. २, मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल्स), उपमुख्य मलनि:सारण नलिका, मलनि:सारणासंबंधी इतर कामे, स्थापत्य कामे, साधनसामुग्री, (ड) शहरातील नागझरी नाले सुधारण्यासाठी (यादी क्र.एस-१३), पान क्र. ५१, अ. क्र. ५, वॉर्ड क्र. १६ स. नं. १४४/१४५ येथून येणारा पावसाळी नाला चॅनेलायझिंग करणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १६ मध्ये पोलिस वसाहत येथे पाण्याची संपवेल बांधून कार्यान्वित करणे | --- | १५ लाख |

**<u>विषय क्र. ३३६</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.विद्या भोकरे व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. ३०/७/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ४५९ दि. ४/८/२००९.

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विका क्र.३/५३४ दि. १३/११/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३४, दि. २४/११/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्रं. ५० मधील कसबा पेठ येथील शेख सल्ला दर्ग्याच्या शेजारील बाजूला कब्रस्तानमधील विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| <u>अर्थशिर्षक</u> | <u>कमी</u> | <u>अधिक</u> |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणाअंतर्गत करावयाची कामे, कसबा–विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, डीसीएनटी ९ २५/३६ सीई २२अे ६१४/व्ही४–२५, कसबा पेठ मटन मार्केट येथे विविध दुरुस्तीविषयक कामे करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. ५० मधील कसबा पेठ येथील शेख सल्ला दर्ग्याच्या शेजारील बाजूला कब्रस्तानमधील विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |

**<u>विषय क्र. ३३७</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.विद्या भोकरे व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. ३०/७/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ४६० दि. ४/८/२००९.

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विका क्र.३/५३५, दि. १३/११/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३५, दि. २४/११/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्र. ५० मधील मनपा शाळा क्र. ८ मधील संस्कार वर्ग व्यायामशाळा, अभ्यासिकासाठी व महिलांच्या व्यायामशाळेसाठी पहिला व दुसरा मजला वाढविणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| <u>अर्थशिर्षक</u> | <u>कमी</u> | <u>अधिक</u> |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६०, अ.क्र. ३५, शहरात विविध ठिकाणी व्यायामशाळा बांधणे, (यादी क्र. एस–१२), पान क्र. २५०, अ.क्र. १०, वॉर्ड क्र. ५० मध्ये शाळा क्र. ८ दादोजी कोंडदेव साततोटी चौक याठिकाणी महिलांसाठी दुसरा मजला वाढविणे, व्यायामशाळा बांधणे व व्यायामाचे साहित्य पुरविणे | १० लाख | --- |
| अ.क्र. ११, वॉर्ड क्र. ५० मध्ये शाळा क्र. ८ दादोजी कोंडदेव साततोटी चौक याठिकाणी महिलांसाठी दुसरा मजला वाढविणे, व्यायामशाळा बांधणे व व्यायामाचे साहित्य पुरविणे | १० लाख | --- |

| | | |
|---|---|---|
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. ५० मधील मनपा शाळा क्र. ८ मधील संस्कारवर्ग, व्यायामशाळा अभ्यासिकासाठी व महिलांच्या व्यायामशाळेसाठी पहिला व दुसरा मजला वाढविणे | --- | २० लाख |

**<u>विषय क्र. ३३८</u>**

संदर्भ :– १) मा.संजय भोसले व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. २७/४/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७२ दि. ५/५/२००९.
३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्र. मआ/विअ(पथ)/५३७ दि. १६/११/२००९ ने पाठविलेला अभिप्राय.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३७, दि. २४/११/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉ. क्रं. २१ मधील विविध विकास कामे करणेकरिता रक्कम रू.४० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्रं.एस–२), पान क्रं. २२७, अ.क्रं.५४,वॉ.क्रं.२१आदर्श सोसायटी, रामनगर ते पांडूलमाण वस्ती दरम्यानचा खाणीचा धोकादायक डोंगराचा भाग काढून गनायटींग प्लास्टर करणे. | ४० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉ.क्रं.२१ गुरूव्दारा व डॉ.पाटील दवाखाना शेजारी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रिटीकरण करणे | --- | १० लाख |
| २) लक्ष्मीनगर येथे पोलीस चौकी समोरील भागात जयशक्ती मंडळ परिसरात १८ इंची व १२ इंची ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रिटीकरण करणे | --- | १० लाख |
| ३) जयजवाननगर येथे रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ४)जयजवाननगर व विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |

**<u>विषय क्र. ३३९</u>**

संदर्भ :– १) मा.संजय भोसले व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. २७/४/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७५ दि. ५/५/२००९
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विका क्र.२/५४१ दि. १७/११/२००९ ने पाठविलेला अभिप्राय..
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३८, दि. २४/११/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉ.क्रं.२१ जयजवाननगर (१) रामनगर गोपाळ गणेश मित्र मंडळ जवळील सुलभ शौचालय बांधणे, (२) रामनगर येथील समाजमंदिराचे उर्वरित काम पूर्ण करणे (३) लक्ष्मीनगर पोलिस चौकी समोरील सुलभ शौचालय बांधणे कामी खालीलप्रमाणे रक्कम रू. ३० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २०८, अ.क्र. १, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्रं.जी–१), पान क्रं. २५८, अ.क्रं. २८, वॉर्ड क्र. २१ | | |
| रामनगर येथील सुलभ शौचालयाचे काम करणे | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| (१) रामनगर गोपाळ गणेश मित्र मंडळ जवळील सुलभ शौचालय बांधणे | --- | १० लाख |
| (२) रामनगर येथील समाजमंदिराचे उर्वरित काम पूर्ण करणे | --- | १० लाख |
| (३) लक्ष्मीनगर पोलिस चौकी समोरील सुलभ शौचालय बांधणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ३४०**

संदर्भ :– १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ४९८ दि. १२/२/२००९
२) जाहिर प्रकटन प्रसिध्द – जाहिरात क्र. ४/६७ दि. ५/६/२००९.
३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/टीजीओ/५४० दि. १६/११/२००९ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०५४, दि. २४/११/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या वातानुकूलित थिएटर्स व मल्टिप्लेक्स थिएटरच्या प्रति शो दरामध्ये खालील तकत्यामध्ये दर्शविलेल्या दराप्रमाणे दरवाढ करणे क्रमप्राप्त असल्याने सदर दरवाढीच्या अंमलबजावणी मे.शासनाच्या निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येणार आहे. सदरबाबत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५५(१) ३ अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर प्रकटन देवून मिळकतदारांच्या/नागरिकांच्या हरकती व सूचना मागवून सुनावणी घेतली असून मा.मुख्य सभेची फेरमान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाकडे कायद्यातील दुरुस्तीबाबत प्रस्ताव सादर करणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| करमणूक कर (थिएटर टॅक्स) | | | |
|---|---|---|---|
| | तपशील | प्रती खेळ/प्रयोग यांचे दर | |
| | | प्रचलित २००८–०९ | प्रस्तावित २००९–१० |
| (अ) | चित्रपट | | |
| १) | ५०० पर्यंत बैठक व्यवस्था (सिट्स) असणाऱ्या थिएटरला | ४०/– | ४०/– |
| २) | ५०० पेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणाऱ्या थिएटरला | ७०/– | ७०/– |
| ३) | वातानुकुलीत थिएटर व मल्टिप्लेक्स थिएटर | १००/– | २००/– |
| ४) | मराठी सिनेमास | करमाफ | करमाफ |
| (ब) | नाटक | ५०/– | ५०/– |
| (क) | सर्कस, कार्निव्हल पेट्स | ३०/– | ३०/– |
| (ड) | तमाशा | १०/– | १०/– |
| (इ) | संगीत जलसे/शास्त्रीय संगीत उत्सव थिएटरमधील /व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास | ७०/– | ७०/– |
| (ई) | कुस्त्या | २०/– | २०/– |
| (फ) | वरील खेरीज इतर प्रयोग (जर वेगवेगळे खेळ नसतील तर प्रत्येक दिवसास) | ३०/– | ३०/– |

**विषय क्र. ३४१**

संदर्भ :– १) मा.लक्ष्मण आरडे व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि. १९/११/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०५७, दि. २४/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ४९ जुना बाजार मधील विविध रस्ते विकसित करणेसाठी र.रुपये २५ लाख तसेच वॉर्ड क्र. ४९ जुना बाजार मध्ये पावसाळी लाईन टाकणे र.रुपये २५ लाख असे एकूण र.रु. ५० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक, १०.अ. पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र. १५८, अ.क्र. २८, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे (यादी क्र.एस–४०), पान क्र. २४५, अ.क्र.१५, बंडगार्डन ते आर.टी.ओ.चौक उड्डाणपूल उभारणे | ५० लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ४९ जुना बाजार मधील विविध रस्ते विकसित करणे | ––– | २५ लाख |
| २) वॉर्ड क्र. ४९ जुना बाजार मध्ये पावसाळी लाईन टाकणे | ––– | २५ लाख |

**विषय क्र. ३४२**

संदर्भ :– १) मा.विजय देशमुख व मा.संजय भोसले यांचे दि. २१/११/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०५९, दि. २४/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ९२ मध्ये स.नं. ४,५ मध्ये डेकोरेटिव्ह पोल टाकून प्रकाश व्यवस्था करणेसाठी र.रुपये १० लाख व वॉर्ड क्र. ९२ मध्ये स.नं. १० येथे सी.सी.रोड करणेसाठी र.रु. १० लाख असे एकूण र.रुपये २० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १७६, अ.क्र. १०१, डेक्कन कॉलेज परिसरात हेरिटेज पार्क विकसित करणे (तरतुद रुपये ७५ लाख) | २० लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ९२ मध्ये स.नं. ४,५ मध्ये डेकोरेटिव्ह पोल टाकून प्रकाश व्यवस्था करणे | ––– | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. ९२ मध्ये स.नं. १० येथे सी.सी.रोड करणे | ––– | १० लाख |

**विषय क्र. ३४३**

संदर्भ :– १) मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. २४/११/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०६१, दि. २४/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ४५ मध्ये स.नं. ७२ घोरपडी येथे जिम्नॅशियम हॉल व योगा केंद्र बांधणेसाठी र.रुपये ३० लाख तसेच वॉर्ड क्र. ४५ स.नं. ७२ येथील जलतरण तलावाचे उर्वरित कामे करणेसाठी र.रुपये ४० लाख असे

एकूण र.रु. ७० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक , ५.लोकारोग्य, पान क्र. १२८, अ.क्र. ८१, शहरात स्मशान भुमिमध्ये विकासाची कामे करणे. (यादी क्र.एस-२४), पान क्र. २४७, अ.क्र. २३, वॉर्ड सभा आरोग्य कोठीमार्फत नागरिकांना थेट सुविधा देणे.(एकूण तरतूद रुपये ७ कोटी) | ७० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ४५ मध्ये स.नं. ७२ घोरपडी येथे जिम्नॅशियम हॉल व योगा केंद्र बांधणे | --- | ३० लाख |
| २) वॉर्ड क्र. ४५ स.नं. ७२ येथील जलतरण तलावाचे उर्वरित कामे करणे | --- | ४० लाख |

**विषय क्र. ३४४**

संदर्भ :- १) मा.अनिल भोसले, सभागृह नेता, मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.सौ.मुक्ता टिळक, मा.अशोक येनपुरे, मा.हनिफ शेख, मा.विजय देशमुख, मा.रविंद्र धंगेकर व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २४/११/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १०६२, दि. २४/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा पुण्यामध्ये होत आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर आहे. हे संमेलन पुणेकरांच्या दृष्टीने आधुनिकतेकडे नेणारे पण पुण्याची परंपरा जपणारे असे दिमाखात व्हावे की ज्यामुळे पुढील २५ वर्षे पुण्याच्या साहित्यिक व सांस्कृतिक वर्तुळात ह्या संमेलनाची आठवण कृतीशील राहील. त्यामध्ये पुणे महानगरपालिकेचा सहभाग सहप्रायोजकत्व म्हणून असावा आणि त्याकरिता रुपये ५१ लाख देण्याची तरतुद करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

यासाठी वर्गीकरणाने रक्कम उपलब्ध करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना द्यावेत.

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. ३४५**

संदर्भ :- १) मा.अवर सचिव यांचे पत्र जा.क्र.टिपीएस-१८०६/२१२५/प्र.क्र.११९३/०८/नवि-१३, दि.३/६/२००८.

२) मा.स्थायी समितीस सादर केलेले विषयपत्र जा.क्र.मआ/नअ/११९७, दि.५/२/२००८.

३) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०६४, दि. ७/११/२००७.

४) मा.स्थायी समिती ठ.क्र.८३५, दि.१२/९/२००६.

५) मा.स्थायी समिती ठ.क्र.२९२, दि.२७/५/२००३.

६) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१०६६, दि. २१/२/२००३.

७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/७३७, दि. २३/१०/२००८.

८) मा. सौ.मुक्ता टिळक व मा.बंडू केमसे यांची दि. १६/१२/२००८ ची उपसूचना.

९) मा.विशाल तांबे व मा.शांतीलाल मिसाळ यांची दि. १६/१२/२००८ ची उपसूचना.

१०) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १९७, दि. १६/१२/२००८.

विषय - पुणे मनपा वाढीव हद्दीतील २३ गावांमधील डोंगर उताराचे कंटुर सर्वेक्षण करून १.५ या निकषानुसार डोंगरपायथ्याची हद्द निश्चित करणे या कामाचे नकाशे व अहवालाबाबत.

---

मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले. शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपाने शासनाकडे नकाशे पाठविताना सी–डॅक संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार नकाशांवर बी.डी.पी.ची हद्द दर्शविलेली आहे. तथापी आता प्रशासनाने मोनार्क या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचे नकाशे सादर केलेले आहेत. याबाबत दोन्ही नकाशांमधील कडकात कडक ( Stringent of two ) नुसार कार्यवाही करावी तसेच प्रशासनाने मोनार्क या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचे नकाशे शहर सुधारणा समितीकडे सादर केलेले आहेत असे निदर्शनास आलेले आहे. काही ठिकाणी सी–डॅक व मोनार्क या दोन्ही नकाशांमध्ये बी.डी.पी.आलेले नाही. मात्र जागेवर डोंगर सदृश्य परिस्थिती आहे. मौजे बावधन स.नं.५८ मधील जमिनीच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. पौड रस्त्याच्या ब–याच उंचीवर ही मिळकत आहे. सबब सदर मिळकत बी.डी.पी. मध्ये समाविष्ट करण्यात यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २७०, दि. २४/११/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. ३४६</u>

संदर्भ :– १) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि. २/५/२००८ रोजीची नोटीस क्र.टीपीएस ४३०८/४६५/सीआर–६४/०८/नवि–११ ( राजपत्र प्रसिध्द दि. २९/५/२००८ )

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/७६५, दि. ५/११/२००८ चे पत्र.

३) मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र.१८४, दि. ८/१२/२००८.

४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २२७, दि. २७/१/२००९.

विषय – विशेष आर्थिक ( SEZ ) क्षेत्रात संबंधित महानगरपालिका / नगरपरिषदेची विकास नियंत्रण नियमावली लागू करणे व अधिसूचित क्षेत्रात ग्रॉस एरियावर आधारित ग्लोबल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत.

–––

मा. महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

कायदा व न्याय मंत्रालय, केंद्र शासन यांनी विशेष आर्थिक क्षेत्र ( SEZ ) अधिनियम २००५ हा कायदा अंमलात आणला आहे. सदर कायद्यानुसार अंतरदेशीय एसपोर्टसाठी विशेष आर्थिक क्षेत्र ( SEZ ) झोन्सची स्थापना, विकसन व व्यस्थापन करण्याची तरतूद केली आहे. तसेच सदर विशेष आर्थिक क्षेत्राचे ( SEZ ) विकसनासाठी शासन स्तरावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४० अन्वये महानगरपालिका / अ वर्ग महानगरपालिका यांची विशेष आर्थिक क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण स्थापन करण्यात येत आहे. शासनाने जाहीर केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या ( SEZ ) विकसनास महानगरपालिकेतील विकास नियंत्रण नियमावली लागू आहे. तसेच त्याव्यतिरिक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्देशानुसार विशेष आर्थिक ( SEZ ) क्षेत्रासाठी Resolution a to h अटींवर सदर नियमावली लागू करून सदर एस.ई.झेड.क्षेत्रासाठी ग्लोबल एफ.एस.आय.अनुज्ञेय करण्यात येत आहे. शासन निदेशातील मुद्दे खालीलप्रमाणे –

१) संबंधित महानगरपालिकेचे महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी विशेष नियोजन प्राधिकरणाचे सभासद असतील.

२) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी विशेष आर्थिक क्षेत्रामधील दिलेल्या सर्व परवानग्यांबाबत संबंधित म.न.पा.स.३ महिन्यात माहिती घ्यावी. अन्यथा सदर बांधकामास काम थांबविण्याचे अधिकारी संबंधित महानगरपालिकेस राहतील.

३) विशेष आर्थिक क्षेत्रामधील परवानगी विकास नियंत्रण नियमावलीनुसार नसल्यास त्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे राहतील.

४) विकास नियंत्रण नियमावलीत सवलत देण्याचे कोणतेही अधिकार विशेष नियोजन प्राधिकरणास राहणार नाहीत.

५) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी म.न.पा.हद्दीतील सर्व कर आकारणी व जमीन विकास निधी व इतर निधी पुणे महानगरपालिकेकडे भरणे आवश्यक आहे.

६) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी शासनास वेळोवेळी प्रगती अहवाल देणे आवश्यक आहे.

७) विशेष आर्थिक क्षेत्रामधील विकास आराखड्यातील आरक्षणे आवश्यकतेनुसार हद्दीवर आरक्षणाचे स्थलांतर करावयाचे झाल्यास म.न.पा.च्या मान्यतेनुसार कार्यवाही करणार.

८) विशेष आर्थिक क्षेत्रामधील आरक्षण ॲकोमोडेशन रिझर्वेशन ऑफ रिझर्वेशननुसार विकसित करणार.

९) विशेष आर्थिक क्षेत्रामधील नॉन बिल्डेबल आरक्षण विकसित करून म.न. पा.स मोफत हस्तांतर करण्यात येईल. तसेच सदर आरक्षणातील २५ % एफ.एस.आय.अनुज्ञेय करण्यात येईल.

वरील प्रमाणे बदल करण्यास मे.शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१अेअे ) नुसार कार्यवाही करण्यास हरकती सूचना मागविण्यात आल्या असून त्यावर म.न.पा.चे म्हणणे सादर करण्यास मा.उपसंचालक, नगर रचना यांनी कळविले असून, त्याच बरोबर त्यांचे कार्यालयाकडे दाखल हरकती / सूचनांवर नियोजन प्राधिकरण म्हणून म.न.पा.चे म्हणणे / अभिप्राय देण्यास कळविले आहे. शासनाचे निर्देशानुसार पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून खालीलप्रमाणे उपसंचालक, यांचेकडे अभिप्राय / हरकत नोंदविणे योग्य होईल, असे मा.महा.आयुक्त यांचे मत असून त्याप्रमाणे उपसंचालक यांचेकडे अभिप्राय / हरकत नोंदविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) शासनाचे प्रकटनातील Resolution g मध्ये विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये येणा—या आरक्षणाचे ॲकोमोडेशन ऑफ रिझर्वेशनबाबत उल्लेख आहे. तथापि मान्य विकास आराखड्यातील काही आरक्षणे उदा.ई.डब्ल्यू.एस., एच.डी.एच.इ.मनपास बी.एस.यु.पी.प्रकल्पासाठी स्वतंत्र विकसित करावयाची असल्याने त्यामध्ये ॲकोमोडेशन ऑफ रिझर्वेशन अनुज्ञेय करण्यात येऊ नये.

२) पर्यावरणाच्या दृष्टीने हिल टॉप हिल स्लोप व ग्रीन बेल्ट या झोनमध्ये विशेष आर्थिक क्षेत्र जाहीर केल्यास सदर झोनमध्ये डी.सी.रूल नुसार ४ % चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे आवश्यक आहे.

३) मनपाच्या हद्दीतील विकसन प्रस्तावातील सर्व जमीन विकास निधी विशेष नियोजन प्राधिकरणाने मे.शासनाचे राजपत्रातील Resolution b प्रमाणे मनपाकडे जमा करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर मा.उपसंचालक यांचेकडे दाखल सूचना हरकतींवर मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतच्या तक्त्याप्रमाणे अभिप्राय कायम करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :— सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २७१, दि. २४/११/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ३४७</u>**

**संदर्भ —** १) मे.शासन,नगर विकास विभाग,मंत्रालय मुंबई—३२ यांचे TPB ४३०७/२२२६/CR—३३४/२००७/UD—११, दिनांक १७.७.२००८ अन्वयेचे निदेश.

२) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१३४०, दि. ४/२/०९ चे पत्र.

३) मा. सुभाष जगताप व मा.अरूण धिमधिमे यांची दि. १७/७/०९ ची उपसूचना.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.९२, दि. १७/७/२००९

————

